या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः॥
नवरात्रोत्सव
व घटस्थापनेच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २४७। किंमत - ४ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार १३/१०/२०२६ । पाने- ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
राजेंद्र
विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

# एमपीएससी पेपरफुटीचा ‘मास्टरमाईंड’ कोण? भीमनवारांच्या रजेने प्रश्न सुटेल का?

## तुकाराम मुंढेंच्या सहभागातील चौकशीतून सूत्रधारांचा पर्दाफाश होणार का? विद्यार्थ्यांना प्रतीक्षा!



युवावार्ता पंचनामा

पुणे (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील लाखो उमेदवारांच्या भविष्याशी निगडित असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा प्रक्रियेभोवती निर्माण झालेल्या संशयाच्या धुक्याने राज्यातील स्पर्धा परीक्षा क्षेत्र ढवळून निघाले आहे. कथित पेपरफुटीच्या प्रकरणावरून पुण्यात विद्यार्थ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले. त्यानंतर सरकारकडून चौकशी समिती, आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांची चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर जाण्याची घोषणा आणि भरती प्रक्रियेबाबत विविध आश्वासने देण्यात आली. त्यामुळे आंदोलनाला तात्पुरता विराम मिळाला असला, तरी विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न कायम आहेत.

प्रश्नपत्रिका बाहेर गेली असेल, तर ती कोणी आणि कशी बाहेर काढली? या कथित प्रकारातून कोणाला फायदा झाला? परीक्षा यंत्रणेतील कोणाच्या निष्काळजीपणामुळे किंवा संगनमतामुळे हा प्रकार घडला का? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या प्रकरणामागील खरे सूत्रधार तपास यंत्रणांच्या हाती लागणार का? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय एमपीएससीच्या विश्वासार्हतेवरील प्रश्नचिन्ह दूर होणे कठीण आहे.

**‘मास्टरमाईंड’च्या दाव्याने खळबळ; पुरावे समोर येणार का?**

या प्रकरणात विवेकानंद पाटील यांनी अभय वाघ हे कथित मास्टरमाईंड असल्याचा दावा केल्याचे सांगितले जात आहे. या दाव्यामुळे प्रकरणातील संशयाचे वर्तुळ अधिक विस्तारले आहे. मात्र, या आरोपाची अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविण्यापूर्वी स्वतंत्र आणि निष्पक्ष तपास होणे आवश्यक आहे.

चौकशी समितीने या दाव्याची सत्यता, त्यामागील पुरावे, संबंधित व्यक्तींची संभाव्य भूमिका आणि प्रश्नपत्रिकेच्या गोपनीयतेशी संबंधित बाबी तपासल्या पाहिजेत. आरोप खरे ठरल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे; तर आरोपांना आधार नसेल, तर संबंधित व्यक्तींनाही न्याय मिळाला पाहिजे. केवळ नावांची चर्चा आणि आरोप-प्रत्यारोपांमध्ये हे प्रकरण अडकून राहिल्यास मूळ प्रश्न अनुत्तरितच राहतील.

**भीमनवार रजेवर; पण जबाबदारीचे काय?**

विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील प्रमुख मागण्यांपैकी एक म्हणजे आयोगाच्या अध्यक्षांना पदावरून दूर करणे. त्यानंतर विवेक भीमनवार यांनी चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर जाण्याची भूमिका घेतल्याचे वृत्त आहे. मात्र, रजा हा राजीनामा नाही आणि रजेवर जाणे म्हणजे दोष सिद्ध होणेही नाही. त्यामुळे या निर्णयाने प्रशासनिक पातळीवरील प्रश्न सुटले, असे मानता येणार नाही.

आयोगाच्या कार्यपद्धतीत नेमक्या कोणत्या त्रुटी होत्या, प्रश्नपत्रिकेची गोपनीयता राखण्यासाठी कोणती सुरक्षा व्यवस्था होती, नियमांचे पालन झाले का आणि कथित गैरप्रकाराची माहिती संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचली होती का, याचा सखोल तपास होणे गरजेचे आहे. अध्यक्षांसह संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची भूमिका पुराव्यांच्या आधारे निश्चित झाली पाहिजे.

व्यक्ती बदलणे किंवा एखाद्या अधिकाऱ्याला रजेवर पाठविणे हा अंतिम उपाय नाही. परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करून भविष्यात अशा प्रकारांना प्रतिबंध घालणारी सक्षम यंत्रणा उभारणे, हीच या प्रकरणातून अपेक्षित असलेली महत्त्वाची बाब आहे.

माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून, तुकाराम मुंढे यांची समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आल्याचे वृत्त आहे. समितीला दोन महिन्यांत अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आल्याचे सांगितले जाते. या चौकशीच्या निष्कर्षांकडे विद्यार्थी, पालक आणि स्पर्धा परीक्षा क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

चौकशी केवळ कागदपत्रांच्या तपासणीपुरती मर्यादित न राहता प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून तिची छपाई, साठवण, वाहतूक, वितरण आणि डिजिटल सुरक्षेपर्यंतच्या प्रत्येक टप्प्याची तपासणी झाली पाहिजे. प्रश्नपत्रिकेपर्यंत कोणाला प्रवेश होता,

(पान ३)

नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
CAMEL SAGO
कॅमल®
सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

जगात एकंच...
फक्त माझंच
अश्या सर्व महिलांसाठी...
मंगळसूत्र महोत्सव
11 ते 20 ऑक्टोबर 2026
मंगळसूत्राच्या मजुरीवर 25% सूट.
जानकिराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
+91 7588 249 849
पत्ता : राजेंद्र क्लॉथ समोर, मेन रोड संगमनेर, अहिल्यानगर - ४२२६०५.

## आम्ही पुन्हा रस्त्यावर उतरू - अभिजीत दिपके



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

जोपर्यंत नरेंद्र मोदींच्या हुकूमशाहीचा अंत होत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहील. आम्ही लवकरच पुन्हा रस्त्यावर उतरू, असा थेट इशारा कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिला आहे. नुकत्याच झालेल्या अटकेच्या कारवाईनंतर माध्यमांशी संवाद साधताना दिपके यांनी दिल्ली पोलिसांवर मानसिक छळ आणि मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्याचा गंभीर आरोप केला. तसेच, राज्यातून हद्दपार करण्याच्या प्रश्नावरून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही जोरदार निशाणा साधला.

अटकेच्यावेळी महिला पोलिसांना पुढे करण्याच्या पोलिसांच्या रणनीतीवर दिपके यांनी टीका केली. ते म्हणाले, पुरुष पोलिस अधिकाऱ्यांनी जे गैरवर्तन केले आहे, त्याची दिल्ली पोलिसांना लाज वाटली असावी, म्हणूनच त्यांनी स्वतःला वाचवण्यासाठी महिला पोलिसांना पुढे केले. आमच्याकडून चुकून काही घडले तर आम्ही महिला पोलिसांसोबत गैरवर्तन करतोय, असे त्यांना दाखवायचे होते. पण आम्ही दिल्ली पोलिसांसारखे गुंड नाही, आम्ही सुशिक्षित आहोत आणि महिलांना आदराने कसे वागवायचे हे आम्हाला चांगले माहीत आहे.दिल्ली पोलिसांनी कायदेशीर अधिकारांचे उल्लंघन केल्याचा दावा करत दिपके म्हणाले, मला वकिलाशी किंवा भावाशी बोलू दिले नाही. पोलिसांनी हिंमत असेल तर माझा पूर्ण अनएडिटेड व्हिडिओ समोर आणावा. त्यांनी माझा पत्ता किंवा ठाणे संपूर्ण दिवस माझ्या वकिलांना किंवा घरच्यांना सांगितले नाही. माझ्या आजीचे निधन झालेले असतानाही, पोलिसांनी रात्री साडेतीन वाजता माझ्याकडे अटकेचे पेपर आणले आणि ‘तू आता दीर्घकाळ जेलमध्ये जाणार आहे असा धाक दाखलवला.

## ज्ञानेशकुमारांना सोडणार नाही - राहुल गांधीचा इशारा



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

ज्ञानेश कुमारांना वाचवण्यासाठी ताकद लावली जात आहे, पण सरकार खूप मोठी चूक करत आहे. जेवढं वाचवण्याचा प्रय़त्न करतील तेवढे आम्ही त्यांच्या नियंत्रकांकडे जाऊ, ज्ञानेश कुमार तुम्हाला थेट सांगतोय तुम्हाला सोडणार नाही, मोदी त्यांना वाचवत आहेत, पण कितीही वाचवलं शेवटी कंट्रोलरकडे जाऊ, अशा शब्दात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हल्ला चढवला. कितीही वेळ लागला, तरी चालेल, पण कोणत्याही स्थितीत राजीनामा घेतल्याशिवाय देशाचा युवक मागे हटणार नाही, असे सांगत राहुल गांधी यांनी आरपारच्या लढाईचं रणशिंग फुंकलं. राहुल म्हणाले की, पोलीस अस्वस्थ आहेत. तरुणांना मारहाण करायला आम्हाला का भाग पाडले जात आहे, असे ते विचारत आहेत. तरुणांना थांबवण्यास आम्हाला सांगितले जात आहे, असे ते म्हणत आहेत.

(पान २ वर)

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
बस्ता बांधायला यायचं हं!
FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

हॉलमार्क प्रमाणित
AN ISO 9001:2008
GOVT. APPROVED VALUER
PBM Jeweller's
सर्व सोन्याचे दागिने
HUID हॉलमार्क प्रमाणित
घटस्थापनेच्या सोने खरेदीवर 551/- प्रति ग्रॅम मजुरी
*नियम व अटी लागू
घटस्थापनेच्या हार्दिक शुभेच्छा
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
•विश्वास •शुध्दता •विविधता.
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999 | 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# मातीचा कपाळकरंटा शेतकरी पुत्रांच्या वेदना- माजी मंत्री थोरात

## अशोक शेटे लिखित‘मातीचा कपाळकरंटा’ आणि ‘चला माणूस होऊया...’ चा प्रकाशन सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सह्याद्री कॉलेजच्या के. बी. दादा हॉलमध्ये संपन्न झाला. यावेळी माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी बोलताना वरील गौरव उदगार काढले. शिक्षक म्हणून काम करताना सामाजिक बांधिलकी म्हणून मातीचा कपाळकरंटा या कादंबरीत त्यांनी संवेदनशील पणे व बारकाईने शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले आहे. चला माणूस होऊया... या कवितासंग्रहामध्ये पुरोगामी विचार मांडून आत्ताच्या भीषण परिस्थितीत आशादायक चित्र निर्माण केले आहे. ते खरोखरच स्तुत्य आहे, असेही ते म्हणाले.

ग्रामीण जीवन, विवाहसंस्थेतील बदल आणि सुशिक्षित शेतकरी तरुणांच्या रखडलेल्या विवाहांची वेदना मांडणाऱ्या ‘मातीचा कपाळकरंटा’ कादंबरीचे व माणुसकीशी नाते सांगणाऱ्या ‘चला माणूस होऊया’ या कवितासंग्रहाचे साहित्यप्रेमींनी स्वागत करावे असे आवाहन लेखक अशोक शेटे यांनी केले. डॉ.संजय कळमकर यांनी आपल्या खुमासदार शैलीत श्रोत्यांना खळखळून हसवले. त्यांच्या ओघवत्या संवादाने सभागृहात हास्याची कारंजी फुलली आणि कार्यक्रमाला विशेष रंगत आली. प्रकाशक कॉ. प्रशांत आंबी यांनी अशोक शेटे यांच्या लेखनासाठीच्या परिश्रमांचे कौतुक केले. समाजासाठी योगदान देणाऱ्या पुरोगामी विचारवंतांचे साहित्य वाचकांनी वाचावे असे मत व्यक्त केले.शेटे यांनी मेहनतीने सामाजिक विषय हाताळला असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय मनोगतात रावसाहेब रोहोकले गुरुजी यांनी समाजात निर्माण झालेल्या विवाहविषयक प्रश्नांकडे लक्ष वेधले.

डॉ. कैलास दौंड यांनी ‘चला माणूस होऊया’ या कवितासंग्रहाविषयी बोलताना हा संग्रह मानवतेची शिकवण देत असल्याचे सांगितले. माणुसकीचा विचार व्यक्त करणाऱ्या शेटे यांच्या कवितांचे त्यांनी कौतुक केले. या कार्यक्रमाला उद्योगपती रोहित डुबे, युवावार्ताचे संपादक किसन भाऊ हासे,रावसाहेब डुबे,राजहंस दुध संघाचे संचालक रमेश गुंजाळ, ॲड.अशोक हजारे,

सह्याद्री संस्थेचे रजिस्टार बाबा खरात, प्राचार्य बाळासाहेब वाघ, डॉ.संतोष खेडलेकर, संदीप वाकचौरे,डॉ. शेवाळे, अरविंद गाडेकर, अनिल देशपांडे, प्रकाश गोडसे, कैलास शेटे, विश्वनाथ शेटे, बी. के. जोशी, सम्राट सुर्वे, संदीप शेळके यांच्यासह साहित्यप्रेमी, शिक्षक, वाचक, नातेवाईक आणि मित्रपरिवार उपस्थित होता. कार्यक्रमासाठी सुंदर रांगोळी रेखाटन दशरथ पवार यांनी तर फलक लेखन प्रदीप अनाप यांनी केले.आलेल्या पाहुण्यांचे स्वागत आर.पी.राहणे तर परिचय स्वप्निल कोल्हे यांनी केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोमनाथ गोडसे यांनी केले. अध्यक्षपदाची सूचना शांताराम डुबे यांनी मांडली. अक्षय खतोडे व सोमनाथ घुले यांनी सूत्रसंचालन केले, तर शशिकांत आव्हाड यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.संजय आंबरे,दत्ता ढगे, राम शेटे,डॉ.मंगेश कडलग यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात पेमगिरी आणि खांडगाव ग्रामस्थ तसेच साहित्यप्रेमी उपस्थित होते.

# अभिनेत्री मधु कांबीकर यांचे निधन



पुणे (प्रतिनिधी))

ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी कलावंत मधु कांबीकर यांचे निधन झाले आहे. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या अनेक वर्षांपासून अभिनेत्री आजाराशी झुंज देत होते. अखेर त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने मराठी सिनेसृष्टीत दु:खाचा डोंगर कोसळला आहे. २८ जुलै १९५३ साली मधु कांबीकर यांचा जन्म बीड जिल्ह्यातील माळेगाव खुर्द येथे झाला. तमाशाच्या फडातून त्यांच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. तमाशानंतर त्यांनी रुपेरी पडद्यावर पाऊल ठेवलं. चित्रपट, लोकनाट्य, व्यावसायिक रंगभूमी ते दूरदर्शन मालिकांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांच्या ‘शापित’ या चित्रपटातून मधू कांबीकर यांच्या अभिनयाची विशेष दखल घेतली गेली. ‘हेच माझं माहेर’, ‘राघुमैना’, ‘एक होता विदूषक’, ‘झपाटलेला’, ‘डेबू’ आणि ‘येऊ का घरात’ यांसारख्या सिनेमामधील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांच्या स्मरणात राहिल्या.मराठी सिनेसृष्टीतील मधु कांबीकर या महत्त्वाच्या अभिनेत्रींपैकी एक होत्या.

त्लावणी आणि सहज सुंदर अभिनयासाठी मधु कांबीकर यांची विशेष ओळख होती. लावणी क्षेत्रासह अभिनयातही त्यांचे विशेष योगदान होते. त्यांनी आपल्या खास शैलीतून प्रेक्षकांच्या मनात एक अढळ स्थान निर्माण केलं होतं.

## पान १ वरून ज्ञानेशकुमारांना सोडणार...

आरएसएसचे गुंड महिलांना मारहाण करत आहेत. एक प्रकारे, आम्हाला पेलेट गन वापरण्यास सांगितले जात आहे. दिल्लीला एका किल्ल्यात रूपांतरित करण्यात आले आहे. रेल्वे आणि बस थांबवल्या जात आहेत. त्यांनी आरोप केला की, भाजप आणि आरएसएसचे गुंड महिलांना मारहाण करत आहेत. राहुल म्हणाले की, लोकांना का मारहाण केली जात आहे, असा प्रश्न पोलीसही विचारत आहेत. विरोधी पक्ष मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची, मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाला स्थगिती देण्याची आणि मतपत्रिका वापरून निवडणुका घेण्याची मागणी करत आहे. राहुल म्हणाले, आम्ही प्रत्येकाच्या आवाजाला धर्म मानतो. राहुल म्हणाले, सरन्यायाधीश विरोधी पक्षांच्या नेत्यांना भेटणार नाहीत. तुम्ही जे काही म्हणाल, सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करा.

आज विरोधी पक्षांचे नेते सर्वोच्च न्यायालयात जाऊन याचिका दाखल करतील. कोट्यवधी तरुणांना लोकशाही वाचवायची आहे, जे संविधानाला धर्म मानतात. आम्ही प्रत्येकाच्या आवाजाला धर्म मानतो आणि त्यावरच हल्ला होत आहे.राहुल म्हणाले, पहिल्या दिवशी आम्ही म्हणालो की आम्ही निवडणूक आयोगाकडे जाऊ. सर्व विरोधी पक्षांचे नेते हिंसाचाराशिवाय तिथे गेले, पण आम्हाला थांबवण्यात आले. आम्हाला बसमध्ये बसवण्यात आले. आम्हाला सांगण्यात आले की आम्ही आंदोलन करू शकत नाही. पोलीस अधिकारी म्हणाले की आम्ही घरीच आंदोलन करावे. आम्ही म्हणालो, आम्हाला मोकळीक द्या. ते म्हणाले, दुसऱ्या दिवशी आम्ही म्हणालो की आम्हाला निर्धारित ठिकाणी (जंतर मंतर) बसू द्या. तेव्हा आम्हाला मारहाण करण्यात आली. मग आम्ही राजघाटावर गेलो. तिथेही आम्हाला मारहाण झाली. आता आम्ही सर्वोच्च न्यायालयात जात आहोत.

# अकोल्याच्या विकासासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवा

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आम्ही सर्व एकच – डॉ. सुजय विखे



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - प्रतिनिधी राजकारणात आरोप-प्रत्यारोप, मतभेद आणि निवडणुकीतील संघर्ष हा लोकशाहीचा भाग असला, तरी शेतकऱ्यांचे प्रश्न, पाण्याचे नियोजन आणि तालुक्याच्या विकासासाठी सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येणे आवश्यक आहे. राजकीय मतभेद असले, तरी आम्ही एकमेकांचे शत्रू नाही. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आम्ही सर्वजण एक आहोत, अशी स्पष्ट भूमिका भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी मांडली

नवरात्री घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर राजूर येथे सुरू केलेल्या ‘हृदया कलेक्शन’ या दालनाचे उद्घाटन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते आमदार किरण लहामटे आणि माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना डॉ. विखे पाटील यांनी सर्वपक्षीय नेत्यांना विकासाच्या मुद्द्यांवर एकत्र येण्याचे आवाहन केले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने अकोले तालुक्यात येताना काहीशी काळजी वाटत होती, अशी मिश्कील टिप्पणी करत त्यांनी तालुक्यातील राजकीय वातावरणाकडे लक्ष वेधले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत अकोले तालुक्यातील विविध प्रवर्गांतून मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल झाल्याचा उल्लेख त्यांनी केला. यावरून तालुक्यातील राजकीय जागरूकता आणि सहकार क्षेत्रातील सक्रियता स्पष्ट होते. अकोले तालुक्याला वैचारिकतेची परंपरा लाभली आहे. राजकीय मतभेद असतानाही तालुक्याच्या प्रश्नांवर एकत्र काम करण्याची तयारी लोकप्रतिनिधींनी दाखवली, तर विकासाला अधिक गती मिळू शकते, असे त्यांनी नमूद केले.

राजकारणात मतभेद असणे स्वाभाविक आहे; मात्र त्यामुळे वैयक्तिक संबंधांमध्ये कटुता निर्माण होऊ नये. परस्परांचा सन्मान राखत संवादाची परंपरा कायम ठेवली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आपल्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीचे अनुभव सांगताना डॉ. विखे पाटील यांनी राजकीय प्रतिमा आणि पेहरावावर मिश्कील भाष्य केले. केवळ पेहरावावरून माणसाचे मूल्यमापन करता येत नाही. माणसाचे कार्य, कर्तृत्व आणि समाजासाठी केलेले काम हीच त्याची खरी ओळख असते, असे त्यांनी स्पष्ट केले. आमदार किरण लहामटे यांच्याशी संवाद साधताना, तुम्ही माझ्या एका शब्दाला मान दिलात, तर मीही तुमच्या दहा शब्दांना मान देईन,’ असे सांगत त्यांनी परस्पर सन्मान आणि संवादाचे महत्त्व अधोरेखित केले.

अकोले तालुक्यातील पाणीप्रश्न, शेती आणि शेतकऱ्यांच्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्र काम करणे आवश्यक असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले. शेतकरी अडचणीत असताना राजकीय मतभेदांपेक्षा त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. विकासाच्या मुद्द्यांवर संवाद साधून प्रश्न सोडविण्याची जबाबदारी सर्वांची आहे, असे त्यांनी सांगितले.

# ठाकरे बंधूवर गुन्हा दाखल

मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी रविवारी दादरच्या शिवाजी पार्कवर झालेल्या आंदोलनाप्रकरणी आता मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पोलिसांच्या धरपकडीला विरोध करत आंदोलनात उडी घेणारे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांच्यावर शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परवानगी नसताना बेकायदा जमाव जमवल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

सीजेपी या संघटनेने निवडणूक आयोगाच्याविरोधात आणि ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी शिवाजी पार्कात आंदोलनाची हाक दिली होती. मात्र, पोलिसांनी या आंदोलनाला परवानगी नाकारली होती. तरीही मोठ्या संख्येने तरुण-तरुणी शिवाजी पार्कात जमल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. अंजली दमानिया यांच्यासह सुमारे ३०० आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.


## नोकरीची सुवर्णसंधी

## 'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

**पदे: Field Sales Executive**
**Business Development Manager**

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

**पात्रता**

* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

**सुविधा**

आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165


# लावणीची अदाकारी थांबली; आठवणी जीवंत राहिल्या

## मधुताई कांबीकर यांचे प्रदीर्घ आजाराने निधन



आज सकाळीच मधूताईंच्या सुनबाई शीतल यांचा फोन आला, लगेचच माझे मित्र प्रदीप निफाडकर यांना फोन लावला. त्यांनी जरावेळ घेतला आणि बातमी खरी असल्याचे काही वेळाने कळवले. मनात प्रचंड कालवाकालव झाली. असंख्य आठवणीनी मन भरून आले. मागील काही वर्षांपासून मधुताईंचा विषय निघाला की मनात कालवाकालव होते. काही नाती अशी असतात की जी रक्ताच्या नात्यांपेक्षाही अधिक जिव्हाळा निर्माण करतात, अशा नात्यांपैकी एक नाते म्हणजे माझ्या भगिनी मधुताई कांबीकर आणि माझे नाते. मराठी चित्रपटसृष्टीतील एक महत्वाचे नाव म्हणजे मधु कांबीकर. अगदी राजदत्त यांच्या शापित सारख्या चित्रपटांपासून ते तमाशावर आधारित एक होता विदुषक ते थेट दादा कोंडके यांच्या ’ मला घेऊन चला ’ सारख्या चित्रपटांमध्ये मधुताई चपखल बसायच्या हेच त्यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य.

मागील २०-२२ वर्षात ताई सातत्याने संगमनेरला घरी यायच्या. ताईनी त्यांच्या गुरु लक्ष्मीबाई यांच्या नावाने सुरु केलेलं लक्ष्मीबाई कोल्हापूरकर प्रतिष्ठान म्हणजे त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय, ताई प्रतिष्ठानच्या अध्यक्ष तर मी सदस्य. प्रतिष्ठानचे इतर सदस्य वेळोवेळी बदलले जात होते मी आणि शाहीर दादा पासलकर मात्र कायम ताई सोबत असायचो. प्रतिष्ठानच्या कामाच्या निमित्ताने, कार्यक्रमांच्या निमित्ताने पुण्याला ताईंच्या घरी जाणे व्हायचे. बऱ्याचदा सोबत अनेक मित्र असायचे मुळात त्यांना मधुताईंना भेटण्याची, बघण्याची त्यांच्याशी बोलण्याची इच्छा असायची. माझ्यासोबत कितीही मित्रमंडळी असली तरी मधुताई सर्वांना घरीच जेवणाचा आग्रह करणार. यात सुनबाई शीतल यांची अगत्यशीलता महत्वाची असायची.

’ सखी माझी लावणी’ हा मधु ताईंचा अतिशय गाजलेला कार्यक्रम. लावणीचा अस्सल बाज असलेला असा कार्यक्रम त्यापूर्वी कधी झाला नव्हता आणि पुढेही होणे शक्य वाटत नाही.पुढे काही कारणांनी हा कार्यक्रम बंद झाला.एकदा आमच्या लक्ष्मीबाई कोल्हापूरकर प्रतिष्ठानचा पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात कार्यक्रम होता प्रमुख अतिथी म्हणून डॉ मोहन आगाशे येणार होते. मधु ताई आणि डॉ आगाशे यांनी एक होता विदुषक चित्रपटात एकत्र काम केले होते. त्यात ताईंनी डॉ आगाशे यांच्यासमोर एक लावणी पेश केली होती. मी ताईंना आग्रह केला की तुम्ही बालगंधर्वला ही लावणी केलीच पाहिजे. ताई कार्यक्रमासाठी सहावार साडी नेसून आल्या होत्या लावणीसाठी अशी साडी अजिबात योग्य नसते पण माझ्या आग्रहाखातर ताईंनी त्या दिवशी अप्रतिम लावणी पेश केली.



काही वर्षांपूर्वी ज्येष्ठ साहित्यिक बलुतंकार दया पवार यांच्या परिवाराच्या वतीने देण्यात येणारा दया पवार पुरस्कार जाहीर झाला योगायोग म्हणजे मधुताई आणि मला एकाच कार्यक्रमात पद्मश्री दया पवार प्रतिष्ठानच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. एकाच कार्यक्रमात बहिण भावांचा सन्मान होण्याचा मराठी कला क्षेत्रातला तो पहिलाच प्रसंग असावा.

एकदा लावणी सम्राज्ञी गुलाबबाई संगमनेरकर यांच्या अमृतमहोत्सवाचा कार्यक्रम होता. प्रमुख पाहुणे होते ज्येष्ठ कलारसिक आणि पुढे सिक्कीमचे राज्यपाल झालेले श्री. श्रीनिवास पाटील साहेब माझे जिवाभावाचे मित्र पानिपतकार विश्वास पाटील साहेब. या कार्यक्रमाला मधुताई, प्रसिद्ध ढोलकीपटू आमचे मित्र पांडुरंगदादा घोटकर हेही उपस्थित होते. गुलाबमावशी सत्काराला उत्तर द्यायला उभी राहिली आणि मावशीला माझ्यासह सर्वांनी लावणीचा आग्रह केला. मावशीनेही फारसे आढेवेढे न घेता लावणी सुरु केली. त्या दिवशी मधुताई सर्दीने बेजार झालेल्या होत्या पण खरा कलाकार त्याच्या जिव्हाळ्याचे काही सुरु झालं की स्वस्थ बसू शकत नाही. मधुताईंच तेच झालं. आजारी असलेल्या मधुताई गुलाबमावशीच्या लावणीवर अदाकारी करू लागल्या. हे बघून आमचे पांडूरंग दादा स्वस्थ बसने शक्य नव्हते. खर तर तिथे ढोलकी वगैरे काहीच नव्हत पण दादांची बोटे त्यांना चैन पडू देईना. दादांनी तिथला एक फायबरचा टेबल जवळ ओढून घेतला तोच ढोलकी म्हणून वाजवायला सुरुवात केली. एक अनोखी जुगलबंदी सुरु झाली. भारतातला सर्वश्रेष्ठ ढोलकीपटू टेबल वाजवतोय, एक महान लावणी सम्राज्ञी लावणी गातेय आणि एक तितकीच श्रेष्ठ लावणी नृत्यांगना अदाकारी करतेय. मला वाटते हा क्षण अनुभवणारे आम्ही खरच भाग्यवान होतो.

अशा कितीतरी आठवणी आहेत मधुताई आणि माझ्या परिवारच्या. काही वर्षांपूर्वी मुंबईला एका कार्यक्रमात नृत्य करीत असतानाच मधुताई रंगमंचावर कोसळल्या. तेव्हापासून त्या कोमातच आहेत. कुणालाही ओळखत नाहीत... मी जेव्हा पुण्याला ताईंना भेटायला जात होतो तेव्हा त्यापूर्वी बघितलेली माझी सुंदर ताई... भरभरून गप्पा मारणारी ताई डोळ्यासमोर येते यायची... अंथरुणावर असहायपणे पडून असलेल्या ताईंना बघताना मनाला असंख्य वेदना व्हायच्या. शून्यात डोळे लाऊन फक्त इकडे तिकडे बघणाऱ्या ताईंना त्यांच्या सूनबाई कानाजवळ जाऊन सांगायच्या, ’बघितलं का ताई कोण आलाय? संगमनेरहून खेडलेकर आलेत भेटायला. मग मी हळूच बोलायला सुरुवात करायचो. जुने कलाकार, लक्ष्मीबाई कोल्हापूरकर, ३ डिसेंबरचा दरवर्षी होणारा कार्यक्रम, राजदत्तजी... असं काही काही सांगायला सुरुवात करतो आणि हळूच ओळख पटायची... मधुताई पूर्वीप्रमाणेच गोड हसायच्या... आणि माझा हात घट्ट धरायच्या... ओठ पुटपुटायला लागायचे, पण शब्द फुटत नसायचे... पण या हृदयीचे बोल त्या हृदयी थेट पोहचायचे... आम्ही मग डोळ्यांनीच खूप गप्पा मारायचो... पण मनात कालवाकालव सुरू व्हायची... मी फार वेळ नाही थांबू शकत नसायचो. कधीकाळी माझ्या सदैव हसऱ्या मधुताईंना त्या अवस्थेत बघणे अशक्य असायचे. आज ताई गेल्याची बातमी आली. आणि मन पुन्हा भूतकाळात गेलं... मला घरात येताच थोरल्या बहिणीच्या मायेने आलिंगन देणारी... जेवणाचा प्रेमळ आग्रह करणारी... खूप गप्पा मारणारी ताई आठवायला लागली.

पण असंही वाटतं, ताई तुम्ही आयुष्यभर खूप सोसलं आणि आयुष्याच्या शेवटी आजारपणातही खूप सोसलं... तुमच्या ऐन उमेदीच्या काळात केलेल्या एका सिनेमाचे नाव होते ’शापित’ पण तुमच्याही आयुष्यात शेवटी असे भोग का यावेत... कलाकार हा शापित असं म्हणतात... पण असंही वाटतं ताई तुम्ही सुटलात... एक दशकभर अंथरुणावर पडून होता... किती यातना झाल्या असतील तुम्हाला...

ताई तुमच्यासारख्या कलाकार पुन्हा होणे नाही...

माझ्या लाडक्या मधूताईला भावपूर्ण श्रद्धांजली...

**डॉ. संतोष खेडलेकर**
माजी सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०





3
नवरात्री नऊ दुर्गा
माता चंद्रघंटा

चंद्रघंटा देवीच्या ललाटावर चंद्र शोभायमान असल्यामुळे दुर्गा देवीच्या या स्वरुपाला चंद्रघंटा असे संबोधले जाते दुर्गा देवीचे चंद्रघंटा स्वरुप कल्याणकारी आहे. चंद्रघंटा देवी दशभुजा आहे. गळ्यात पांढरी माळ आहे
माता चंद्रघंटा हे देवी पार्वतीचे विवाहीत आणि अत्यंत कल्याणकारी रुप मानले जाते.

## चंद्रघंटा देवीची ओळख

नाव आणि जन्म :-देवीच्या कपाळावर मस्तकावर, घंटेच्या आकाराचा अर्धचंद्र विराजमान आहे.यामुळे त्यांना चंद्रघंटा असे म्हटले जाते.

आवताऱ्चे महत्व :- ती देवी दुर्गेचा तिसरा आवतार असून, नावरात्रीच्या तिसऱ्या दिवशी तिची पूजा केली जात

रूप :- देवीचे वर्ण सोन्यासारख्या तेजस्वी आणि चमकीला आहे.त्याचे शरीर सुवर्णकांतीप्रमाणे चमकता.

वाहन :- माता चंद्रघंटा यांचे वाहन सिंह (किंवा वाघीण) आहे.

अग्रस्थान :- त्या नेहमी युध्दाच्या किंवा वाईट शक्तींचा नाश करण्याच्या तयारीत असतात, परंतु त्यांचे मुख्र अत्यंत शांत, सौम्य आणि प्रेमळ असते.

# पायी ज्योतीचे बाळासाहेब थोरातांकडून स्वागत

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यात विविध ठिकाणांहून देवीच्या पायी ज्योती आणण्याची परंपरा भक्तिभावाने जपली जात आहे. घुलेवाडी येथील साई स्वराज्य ग्रुपच्या वतीने दरवर्षी वणी येथील आद्य स्वयंभू शक्तिपीठ श्री सप्तशृंगी निवासिनी देवीच्या चरणी नतमस्तक होऊन पायी ज्योत आणली जाते. या पायी ज्योतीचे कारखाना गेट येथे आगमन झाल्यानंतर माजी कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी ज्योतीचे दर्शन घेऊन स्वागत केले. नवरात्र उत्सव हा भक्ती शक्ती आणि चैतन्याचा उत्सव असल्याचे राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी यावेळी म्हटले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या गेटवर गुंजाळवाडी व घुलेवाडी येथील युवकांनी आणलेल्या पायी ज्योतीचे पूजन व स्वागत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, पायी ज्योत आणण्याच्या या धार्मिक उपक्रमातून युवकांमध्ये श्रद्धा, भक्तिभाव आणि एकतेची भावना निर्माण होते. शारदीय नवरात्रोत्सव हा शक्ती, भक्ती आणि चैतन्याचा उत्सव असून, अशा धार्मिक उपक्रमांमुळे सामाजिक एकोपा आणि



सांस्कृतिक परंपरांचे जतन होते. महाराष्ट्रामध्ये तुळजापूर, कोल्हापूर, माहूर आणि सप्तशृंगी गड हे शक्तिपीठे आहेत. भारतीय परंपरेमध्ये महिलांना मोठे आदराचे स्थान आहे. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने महिला शक्तीचा जागर होतो. तालुका हा अध्यात्म आणि पुरोगामी विचार जपणारा तालुका आहे. सर्व लोक एकत्र येऊन सर्व सण मोठ्या उत्साहाने साजरे करतात.

याचबरोबर तालुक्यातील प्रत्येक गावांमधून देवीचे मंदिर असून गावोगावी महिला भगिनी एकत्र येऊन मोठा आनंद उत्सव साजरा करतात. हा काळ आनंदाचे परवा असतो. सणासुदीचा काळ असतो. यावर्षी दुष्काळाचे मोठे संकट आहे. आहे ते पाणी काटकसरीने वापरावे लागणार आहे. जगदंबा मातेच्या कृपेने उर्वरित काळात पाऊस होऊन सर्वांना दिलासा मिळू दे याचबरोबर सर्व नागरिक सुखी समाधानी व आनंदी राहू दे अशी प्रार्थना त्यांनी केली.

पान १ वरून - **एमपीएससी...**

गोपनीय माहिती हाताळण्याची जबाबदारी कोणाकडे होती आणि परीक्षेपूर्वी माहिती बाहेर गेल्याचा संशय असल्यास त्यामागील संभाव्य मार्ग कोणते होते, याचा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच, संबंधित अधिकारी-कर्मचारी, बाहेरील व्यक्ती किंवा कथित मध्यस्थ यांच्यात काही संबंध आढळल्यास त्यांचीही पुराव्यांच्या आधारे चौकशी व्हावी. डिजिटल नोंदी, प्रवेश नोंदवही, पत्रव्यवहार आणि उपलब्ध इतर पुरावे तपासून घटनाक्रम स्पष्ट केला पाहिजे. चौकशीचा उद्देश केवळ एखाद्या व्यक्तीची जबाबदारी निश्चित करणे नसून, कथित गैरप्रकारामागील संपूर्ण साखळी आणि व्यवस्थेतील त्रुटी उघड करणे हा असला पाहिजे. दोन महिन्यांची मुदत संपल्यानंतर अहवालात नेमके काय निष्पन्न झाले, कोणत्या बाबींची पुष्टी झाली आणि पुढील कारवाई काय असणार, याबाबत स्पष्टता अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर सरकारकडून चौकशी समिती, अध्यक्षांची रजा, तीन वर्षांत ७० हजार रिक्त पदे भरण्याचे आश्वासन, २०२७ मधील गट-क भरतीसाठी पदसंख्या वाढविण्याबाबतची घोषणा आणि आंदोलनादरम्यान दाखल गुन्हे मागे घेण्याबाबत सकारात्मक भूमिका जाहीर केल्याचे वृत्त आहे. आयोगाच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याबाबतही चर्चा झाल्याचे सांगितले जाते. मात्र, घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांत मोठे अंतर राहू नये. रिक्त पदे भरण्याचे वेळापत्रक काय असेल? गट-क भरतीतील पदसंख्येबाबत नेमका निर्णय कधी होणार? परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविण्यासाठी कोणत्या सुधारणा केल्या जाणार? चौकशीचा अहवाल सार्वजनिक केला जाणार का? दोष आढळल्यास संबंधितांवर कोणत्याही पदाचा मुलाहिजा न ठेवता कारवाई होणार का? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे सरकारने द्यायला हवीत. विद्यार्थ्यांना केवळ पुढील भरतीच्या तारखा किंवा पदसंख्येची आश्वासने नकोत; त्यांना निष्पक्ष परीक्षा, समान संधी आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळविण्याची खात्री हवी आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी अनेक वर्षे अभ्यासासाठी खर्च करतात. आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वयाची मर्यादा आणि भरतीतील अनिश्चितता यांचा सामना करत ते परीक्षेला सामोरे जातात.

# संदीप वाकचौरे यांच्या चार पुस्तकांची निवड

## संगमनेरच्या साहित्य व शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने २०२४ साठी जाहीर करण्यात आलेल्या शासनमान्य ग्रंथ निवडसूचीत संगमनेर येथील लेखक, पत्रकार व शिक्षण अभ्यासक संदीप वाकचौरे यांच्या चार पुस्तकांचा एकाच वेळी समावेश करण्यात आला आहे. पुणे येथील चपराक प्रकाशनाच्या वतीने प्रकाशित झालेल्या या पुस्तकांच्या निवडीमुळे वाकचौरे यांच्या शैक्षणिक लेखनाची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली आहे.

वाकचौरे यांच्या 'शिक्षणनामा', 'परिवर्तनाची वाट', 'विनोबाची शिक्षणछाया' आणि 'शिक्षण शोध' या चार पुस्तकांचा शासनमान्य ग्रंथसूचीत समावेश झाला आहे. राज्य शासनाने नुकतीच ही निवडसूची जाहीर केली असून, एकाच लेखकाची चार पुस्तके एकाच वेळी या यादीत स्थान मिळविणे ही संगमनेरच्या साहित्य व शैक्षणिक क्षेत्रासाठी महत्त्वाची बाब मानली जात आहे. संदीप वाकचौरे यांची आतापर्यंत सुमारे वीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यापैकी अनेक पुस्तकांचा यापूर्वीही शासनमान्य ग्रंथसूचीत समावेश झाला आहे. चपराक प्रकाशनाच्या माध्यमातून त्यांची सतरा पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यांच्या लेखनातून




शिक्षणव्यवस्थेतील विविध पैलू, शैक्षणिक परिवर्तन, शिक्षणविषयक विचार आणि सामाजिक जाणीव यांचा वेध घेण्यात आला आहे.

वाकचौरे हे गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांतून शिक्षणविषयक स्तंभलेखन करत आहेत. शिक्षण हा केंद्रबिंदू ठेवून त्यांनी सातत्याने केलेले लेखन शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांसाठी महत्त्वाचे ठरत आहे. त्यांच्या पुस्तकांना महाराष्ट्राचे माजी शिक्षण संचालक शिवाजीराव तांबे, डॉ. शकुंतला काळे, ज्येष्ठ शिक्षण विचारवंत ह. ना. जगताप, ज्येष्ठ पत्रकार दिनकर पाटील, दिनकर टेमकर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे आणि शिक्षण अभ्यासक नामदेव माळी यांच्यासह मान्यवरांच्या प्रस्तावना लाभल्या आहेत. एकाच प्रकाशकाच्या माध्यमातून, एकाच लेखकाने शिक्षण या विषयावर सातत्याने केलेल्या लेखनाची ही पुस्तकमालिका आहे. त्यामुळे या चार पुस्तकांची शासनमान्य ग्रंथसूचीत झालेली निवड ही केवळ लेखकासाठीच नव्हे, तर शैक्षणिक साहित्यनिर्मितीच्या दृष्टीनेही उल्लेखनीय मानली जात आहे.

राज्य ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांच्या अध्यक्षतेखालील ग्रंथ निवड समितीने ही यादी जाहीर केली आहे. ज्येष्ठ नाटककार अभिराम भडकमकर यांच्यासह समितीतील सदस्यांनी ग्रंथ निवड प्रक्रियेत सहभाग घेतला.

संदीप वाकचौरे यांच्या चार पुस्तकांची शासनमान्य ग्रंथसूचीत निवड झाल्याबद्दल साहित्य, पत्रकारिता आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# डीजेचा आवाज श्रवणशक्तीसाठी धोकादायक - डॉ. अमृता जोर्वेकर



युवावार्ता (प्रतिनिधी)
गणोरे - सण-उत्सव भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग असले, तरी उत्सवांमधील वाढता डीजेचा कर्णकर्कश आवाज आणि लेझर लाईट्सचा वापर आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो. मोठ्या आवाजामुळे श्रवणशक्तीला कायमस्वरूपी इजा होण्याचा, तर लेझर किरणांमुळे डोळ्यांना गंभीर इजा होण्याचा धोका असतो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे लक्षात ठेवून अशा धोक्यांपासून दूर राहावे असे आवाहन कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. अमृता सागर जोर्वेकर यांनी विद्यार्थ्यांना केले.

जिल्हा परिषदेच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत नमो सेवा संकल्प उपक्रमातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी येथे मोफत कान, नाक व घसा तपासणी शिबिर घेण्यात आले. डॉ. जोर्वेकर यांनी ३५ विद्यार्थ्यांची तपासणी केली. यावेळी पाच विद्यार्थ्यांच्या कानात खडे व पेन्सिलचे तुकडे आढळले. संबंधित विद्यार्थ्यांना दवाखान्यात नेऊन या वस्तू मोफत काढण्याची व्यवस्था त्यांनी केली. कानात पेन्सिल, काडी किंवा अन्य वस्तू घालू नयेत. कान दुखत असल्यास, ऐकू कमी येत असल्यास किंवा कानात काही अडकल्यास स्वतः काढण्याचा प्रयत्न न करता डॉक्टरांकडे जावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

विस्तार अधिकारी अनिल गायकवाड व केंद्रप्रमुख नितीन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका वृषाली सुनील कडलग आणि उपाध्यापिका कल्पना पाटील यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.

# दुष्काळाच्या संकटात नागरिकांच्या पाठीशी शासन-प्रशासनाची भक्कम साथ

## अहिल्यानगर जिल्ह्यात 3 लाख 31 हजार नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा

युवावार्ता (प्रतिनिधी)
अहिल्यानगर- दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी राज्य शासन आणि जिल्हा प्रशासन नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विविध उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्यात येत आहेत. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. ८ ऑक्टोबरपर्यंतच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील १६१ गावांमधील ९६१ वाड्या-वस्त्यांना १६९ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून, ३ लाख ३१ हजार २३३ नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा दिलासा मिळत आहे. दुष्काळाच्या आव्हानात्मक परिस्थितीत नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देत शासन आणि प्रशासनाने मदतीचा हात पुढे केला आहे.



पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, तसेच ग्रामीण भागातील कुटुंबांना आवश्यक पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी प्रशासनाकडून टंचाईग्रस्त गावांमधील परिस्थितीचा आढावा घेऊन पाणीपुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. उपलब्ध यंत्रणा आणि संसाधनांचा प्रभावी वापर करून गरजेनुसार टँकरद्वारे पाणी पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे. दुष्काळाच्या झळा कमी करण्यासाठी शासनाने पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडून प्राप्त अहवालानुसार, जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यामध्ये पाथर्डी तालुक्यात सर्वाधिक ६२ गावांतील ३५१ वाड्या-वस्त्यांना ७४ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. कर्जत तालुक्यात २७ गावांतील १९९ वाड्या-वस्त्यांसाठी २२ टँकर, तर शेवगाव तालुक्यात २८ गावांतील १६८ वाड्या-वस्त्यांसाठी २० टँकर कार्यरत आहेत. नगर तालुक्यात १९ गावांतील ९१ वाड्या-वस्त्यांना १९ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. पारनेर तालुक्यात ४ गावांतील ३१ वाड्या-वस्त्यांसाठी ५ टँकर, संगमनेर तालुक्यात ८ गावांतील १६ वाड्या-वस्त्यांसाठी ७ टँकर, नेवासा तालुक्यात २ गावांतील १८ वाड्या-वस्त्यांसाठी २ टँकर आणि जामखेड तालुक्यात ६ गावांतील ७ वाड्या-वस्त्यांसाठी ८ टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. श्रीगोंदा तालुक्यात ४ गावांतील ४९ वाड्या-वस्त्यांना ४ टँकरद्वारे, तर नगर परिषद पारनेर क्षेत्रात १ गावातील ३१ वाड्या-वस्त्यांना ८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. या उपाययोजनांमुळे जिल्ह्यातील विविध भागांतील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासाठी एकूण १६९ टँकरची व्यवस्था करण्यात आली असून, त्यामध्ये ४ शासकीय आणि १६५ खासगी टँकरचा समावेश आहे. उपलब्ध टँकर यंत्रणेच्या माध्यमातून टंचाईग्रस्त गावांतील वाड्या-वस्त्यांपर्यंत पाणी पोहोचविण्याचे काम सुरू आहे. परिस्थितीनुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे, उपलब्ध पाणीस्त्रोतांचा वापर करणे आणि नागरिकांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून देणे यावर प्रशासनाचा भर आहे.

# कळसुबाई मातेच्या दर्शनासाठी येताना पर्यावरण जपण्याचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)
राजूर - महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर असलेल्या कळसुबाई मातेच्या पवित्र गडावर नवरात्रोत्सवानिमित्त महाराष्ट्रासह राज्याबाहेरील हजारो भाविक व पर्यटक दर्शनासाठी येत असतात. नऊ दिवस चालणाऱ्या या पवित्र उत्सवात कळसुबाई मातेचे दर्शन घेताना प्रत्येक भाविकाने देवी मातेचे पावित्र्य, गडाचे धार्मिक महत्त्व आणि निसर्गसौंदर्य जपण्याची जबाबदारी पार पाडावी, कळसुबाई देवी जाणे साठी माजी मंत्री स्वर्गीय मधुकरराव पिचड यांनी सातत्यपूर्ण देवस्थानचा विकास व्हावा म्हणून कार्य केले. त्यांच्या कार्यकाळात वीज, पायरी, लोखंडी सीडी, कामे झाली भाविकांनी ह्या शिडीचा आधार घेत गडावर जाऊन दर्शन घ्यावं आणि मातेचे पवित्र जपावं, निसर्गाचा आनंद घ्यावा असे विनम्र आवाहन कळसुबाई ट्रस्टचे अध्यक्ष तुकाराम सोमा खाडे सामाजिक कार्यकर्ते. अनंत घाणे.यांनी केले आहे.



गडावर जाताना निसर्गाची कोणत्याही प्रकारे हानी होणार नाही, याची प्रत्येकाने कटाक्षाने काळजी घ्यावी. झाडे, वनस्पती, डोंगराचा परिसर तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

विशेषतः भाविकांनी सोबत आणलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थांचे रॅपर व इतर कचरा गडावर कुठेही टाकू नये. उपलब्ध कचराकुंडीचा वापर करून कचरा त्यात जमा करावा. 'माझा गड - माझी जबाबदारी' या भावनेतून प्रत्येक भाविकाने कळसुबाई गड स्वच्छ, सुंदर आणि पवित्र ठेवण्यासाठी योगदान द्यावे. देवीचे दर्शन घेताना इतर भाविकांच्या श्रद्धेचा आणि धार्मिक भावनांचा आदर करावा.

नवरात्रोत्सव हा केवळ उत्सव नसून श्रद्धा, संस्कृती, निसर्गसंवर्धन आणि सामाजिक एकोपा जपण्याचा पर्वकाळ आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्व भाविकांनी शांततेत, सुरक्षिततेत आणि पर्यावरणपूरक पद्धतीने कळसुबाई मातेचे दर्शन घ्यावे. कुठे अडचण अडथळा निर्माण झाल्यास पोलीस प्रशासन, फॉरेस्ट डिपार्टमेंट व स्वयंसेवक यांची मदत घ्यावी . सरपंच पंढरीनाथ खाडे देवस्थान विश्वस्त अध्यक्ष तुकाराम खाडे राजू भारमल योगेश खाडे. पांडू खाडे. प्रकाश खाडे. चंदर खाडे. नंदू तातळे यांनी केले.

# संपादकीय...

## रस्त्यावर उतरल्याशिवाय न्याय मिळत नाही का?

लोकशाहीत सामान्य माणसाला न्याय मिळवण्यासाठी आंदोलन करावे लागणे, ही गंभीर चिंतेची बाब आहे. आपल्या समस्या मांडण्यासाठी नागरिकांनी रस्त्यावर उतरावे, घोषणाबाजी करावी, उपोषण करावे किंवा मोर्चे काढावेत, तेव्हाच प्रशासनाला जाग येत असेल, तर व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. लोकशाहीमध्ये जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य मिळणे अपेक्षित असते. मात्र, अनेकदा नागरिकांना आपल्या मागण्यांसाठी वारंवार निवेदने द्यावी लागतात, सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात आणि लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा करावा लागतो. तरीही प्रश्न सुटत नसल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो. शेतकऱ्यांच्या मागण्या असोत, विद्यार्थ्यांचे प्रश्न असोत, कर्मचाऱ्यांचे प्रलंबित विषय असोत किंवा एखाद्या गावातील पाणी, रस्ता आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधांचा प्रश्न असो, प्रत्येक ठिकाणी नागरिकांना वेळेत न्याय मिळणे आवश्यक आहे. मात्र, जेव्हा संबंधित विभागाकडून दखल घेतली जात नाही, तेव्हा लोकांमध्ये असंतोष निर्माण होतो. हा असंतोष वाढत जाऊन आंदोलनाचे रूप धारण करतो. त्यामुळे कोणतेही आंदोलन उभे राहिल्यानंतर केवळ आंदोलकांनी रस्ता का अडवला किंवा आंदोलन तीव्र का केले, एवढाच विचार करून चालणार नाही. आंदोलनाची वेळ का आली, याचाही विचार करावा लागेल.

आंदोलन हे लोकशाहीतील नागरिकांचे महत्त्वाचे साधन आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, आपल्या हक्कांची मागणी करणे आणि सरकारचे लक्ष वेधून घेणे, हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. देशाच्या इतिहासात अनेक सामाजिक आणि राजकीय बदल आंदोलनांच्या माध्यमातून घडले आहेत. त्यामुळे आंदोलनाकडे नेहमी नकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. मात्र, प्रत्येक प्रश्नासाठी आंदोलन करावे लागणे आणि आंदोलनाशिवाय प्रशासनाने हालचालच न करणे, ही परिस्थिती निश्चितच बदलायला हवी. अनेकदा आंदोलन सुरू झाल्यानंतर प्रशासनाकडून चर्चेची तयारी दर्शवली जाते. बैठका घेतल्या जातात, आश्वासने दिली जातात आणि मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे सांगितले जाते. त्यानंतर आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले जाते. परंतु आंदोलन संपल्यानंतर दिलेल्या आश्वासनांचे काय होते, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. काही मागण्यांवर निर्णय होतो, तर काही प्रश्न पुन्हा प्रलंबित राहतात. परिणामी, नागरिकांना काही काळानंतर पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो. आश्वासने देऊन आंदोलन संपवणे आणि प्रश्न कायमस्वरूपी सोडवणे, यातील फरक प्रशासनाने समजून घेणे गरजेचे आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार कोणालाही नाही. निवडणुकीच्या काळात नागरिकांच्या समस्या सोडवण्याची आश्वासने दिली जातात. मात्र, प्रत्यक्षात प्रश्न मांडण्यासाठी नागरिकांना संघर्ष करावा लागत असेल, तर त्या आश्वासनांच्या अंमलबजावणीची तपासणी होणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींनी नागरिक आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून काम केले पाहिजे. जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांची जबाबदारी आहे. प्रशासनानेही नागरिकांच्या तक्रारींकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. प्रत्येक निवेदनावर वेळेत कार्यवाही झाली, तक्रारींचे निराकरण पारदर्शक पद्धतीने झाले आणि निर्णय प्रक्रियेत जबाबदारी निश्चित झाली, तर अनेक आंदोलने टाळता येऊ शकतात. नागरिकांना न्याय मिळवण्यासाठी किती दिवस प्रतीक्षा करावी लागेल, याची स्पष्ट माहिती मिळणेही आवश्यक आहे. प्रश्न सुटत नसल्यास त्यामागील कारणे नागरिकांना सांगितली पाहिजेत. संवादाचा अभाव आणि निर्णयातील दिरंगाई यामुळेच अनेकदा संघर्षाची परिस्थिती निर्माण होते. त्याचवेळी आंदोलनकर्त्यांनीही आपल्या मागण्या स्पष्ट आणि रास्त पद्धतीने मांडल्या पाहिजेत. आंदोलन शांततामय असावे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होऊ नये आणि सामान्य नागरिकांना अनावश्यक त्रास होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. आंदोलनाचा उद्देश केवळ सरकारवर दबाव निर्माण करणे नसून, संबंधित प्रश्नावर न्याय्य तोडगा मिळवणे हा असला पाहिजे. प्रशासन आणि आंदोलनकर्ते या दोन्ही बाजूंनी संवादाची तयारी दाखवली, तर अनेक प्रश्न संघर्ष न वाढवता सोडवता येऊ शकतात. खरी लोकशाही तीच, जिथे नागरिकांच्या प्रश्नांची दखल घेण्यासाठी आंदोलनाची वाट पाहावी लागत नाही. एखादा प्रश्न गंभीर होण्यापूर्वीच त्यावर उपाययोजना होणे, नागरिकांना सहज न्याय मिळणे आणि प्रशासनाने जनतेप्रती उत्तरदायी राहणे आवश्यक आहे. रस्त्यावर उतरणे हा नागरिकांचा अधिकार आहे; परंतु प्रत्येक वेळी रस्त्यावर उतरल्याशिवाय न्याय मिळत नसेल, तर व्यवस्थेने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

# विद्यार्थ्यांसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन



युवावार्ता (प्रतिनिधी)

प. पू. गगनगिरी महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पिंपरणे येथे विद्यार्थ्यांच्या व माता-पालकांच्या आरोग्यविषयक जनजागृतीसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात लोटस इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, वडगावपानच्या संचालिका तथा घचइड निघुते मेमोरियल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. नीलिमा शांताराम निघुते यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

यावेळी शारीरिक व मानसिक आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, आरोग्याची काळजी, योग्य व संतुलित आहार तसेच आरोग्यविषयक चांगल्या सवयी याबाबत डॉ. नीलिमा निघुते यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात पौष्टिक आहार, नियमित व्यायाम, योग व ध्यान, पुरेशी झोप आणि स्वच्छतेच्या सवयी अंगीकाराव्यात, तसेच आरोग्यविषयक समस्या उद्भवल्यास योग्य तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या मार्गदर्शनपर व्याख्यानाला विद्यार्थ्यांसह माता-पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. डॉ. नीलिमा निघुते यांच्या अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे उपस्थितांना आरोग्यदायी जीवनशैलीबाबत नवी दिशा मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल विद्यालयाच्या वतीने डॉ. नीलिमा निघुते यांचे आभार मानण्यात आले.

# सर डी. एम. पेटिट विद्यालयात महिला सक्षमीकरणाचा जागर



युवावार्ता (प्रतिनिधी)

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सर डी. एम. पेटिट हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, संगमनेर येथे महिला तक्रार निवारण समिती, माता-पालक समिती आणि सखी सावित्री समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शन व बैठक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. ए. ब्राह्मणे यांच्या अध्यक्षतेखाली आणि पर्यवेक्षक उमेश गुंजाळ तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे इन्चार्ज दशरथ गभाले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्त्या व स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधी सौ. सुनीता शिवराज कोडे, कायदेतज्ज्ञ ॲड. रोहिणी राऊत, पोलीस उपनिरीक्षिका सौ. विद्या झाडे, संगमनेर नगरपालिकेच्या शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापती नगरसेविका डॉ. अनुराधा सातपुते तसेच निवृत्त विशेष शिक्षक व समुपदेशक भाऊसाहेब नरवडे उपस्थित होते. पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा अंजना भोईर, माता-पालक प्रतिनिधी कल्याणी खामकर व सौ. लक्ष्मी सोब यांचीही उपस्थिती लाभली.

पोलीस उपनिरीक्षिका विद्या झाडे यांनी विद्यार्थिनींना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेश दिला. स्वतःच्या सुरक्षिततेबाबत जागरूक राहणे, गरज पडल्यास पोलिसांशी संपर्क साधणे आणि मदत मिळविण्याच्या उपाययोजनांविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यकर्त्या सुनीता कोडे यांनी सामाजिक बांधिलकी, जनजागृती आणि समाजकार्याचे महत्त्व स्पष्ट केले. ॲड. रोहिणी राऊत यांनी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम तसेच महिला व विद्यार्थिनींच्या संरक्षणाशी संबंधित कायदेशीर तरतुदींची माहिती दिली. डॉ. अनुराधा सातपुते यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ आरोग्य, संतुलित आहार, स्वच्छता आणि वैयक्तिक काळजी याविषयी मार्गदर्शन केले. समुपदेशक श्री. भाऊसाहेब नरवडे यांनी योगाभ्यास, मानसिक स्वास्थ्य आणि तणावमुक्त जीवनशैलीचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षिका सुनीता विश्वास शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय रूपाली देशमुख यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन सोनल गुंजाळ यांनी केले.

# सुसज्ज मनोरा तयार, फेब्रुवारीत आमदारांच्या सेवेत

मुंबई -महाराष्ट्र विधानमंडळ जवळील नूतन मनोरा आमदार निवासचे बांधकाम कार्य वेगाने प्रगतीपथावर असून अ आणि ब असे इमारतीचे दोन्ही मनोरे सर्व सुसज्ज सोयी सुविधांसह फेब्रुवारी, २०२८ पूर्वी आमदारांच्या सेवेत येतील. अ मनोऱ्याचे सर्व २९ मजले बांधून पूर्ण झाले आहेत. तर ब मनोऱ्याचे ४२ पैकी ३४ मजले पूर्ण झाले आहेत. आज महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी भेट देवून बांधकामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी सर्व संबंधितांना उपयुक्तता आणि सौंदर्यदृष्टीचा संगम साधत वास्तुचे वैशिष्ट्य जपण्यात यावे, काळजीपूर्वक वापर व्हावा यादृष्टीने नियमावली सुनिश्चित करण्यात यावी तसेच अगोदरच्या सूचनांचे काटेकोर पालन व्हावे असे निदेश दिले.

सर्व सन्माननीय सदस्य यांच्यासाठी तसेच त्यांचे स्वीय सहायक, अभ्यागत, कार्यालय यादृष्टीने एकत्रित असा सुसज्ज निवासी कक्ष या नूतन मनोरा आमदार निवासमध्ये तयार करण्यात येत आहे. उपहारगृहे, पार्किंग, बैठक कक्ष इत्यादी सुविधा असणार आहेत. या पाहणी प्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे, सचिव-४ शिवदर्शन साठ्ये, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता, श्रीमती प्रज्ञा वाळके, कार्यकारी अभियंता विद्याधर पाटसकर, वास्तुविशारद अतुल प्रभु, प्रकल्प व्यवस्थापक सतिश राघवन, प्रकल्प सल्लागार फोर्ट्रेस इन्फ्राकॉम चे श्री. कैलास हे उपस्थित होते.


**संगमनेर सहकारी औद्योगीक वसाहत मर्या., संगमनेर**
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर पिन- ४२२६०८
फोन नं. ०२४२५-२५९०२९ Email-ID-Sangam.sav@gmail.com

**पाहिजेत**

आमचे सहकारी औद्यगिक वसाहतीसाठी खालील पदे भरावयाची आहेत.तरी पात्र उमेदवारांनी स्वःहस्ताक्षरातील अर्ज व शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती दि.२३.१०.२०२६ पर्यंत वरील पत्त्यावर पोहचतील अशा रितीने पाठवावेत.

| अ.नं. | पदाचे नांव | संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभवी(सहकारी संख्या) |
|---|---|---|---|---|
| १. | क्लार्क (महिला/पुरुष) | २ | बी.कॉम | २ वर्षपिक्षा जास्त तसेच संगणक व सहकार कायद्याचे ज्ञान आवश्यक |

१. मुलाखतीसाठी येणाऱ्या उमेदवारांना कोणतेही भत्ता दिला जाणार नाही.
२. योग्य व पात्र उमेदवार न मिळाल्यास भरती प्रक्रिया स्थगित/रद्द करण्याचे अधिकार संचालक मंडळास राहील.
३. मुलाखतीमध्ये उमेदवार पात्र वाटल्यास शैक्षणिक अर्हतेमध्ये शिथीलता देण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

श्री.सोमनाथ रामनाथ पाबळकर, व्हा.चेअरमन
श्री.के.के.थोरात, चेअरमन

**शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये रोजगाराची संधी!**
भरती सुरू आहे
कृषी क्षेत्रात काम करण्याची संवर्णसंधी!
पदाचे नावः-फिल्ड कॉर्डिनेटर - २
कामाचे स्वरुपः-
शेतकऱ्यांबरोबर समन्वय साधणे,शेतकऱ्यांच्या शेतीविषयक मार्गदर्शन व समन्वय,शेतकरी गट/ सभासदांशी नियमित संपर्क ठेवणे, कंपनीच्या कृषीविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे
शैक्षणिक पात्रता
पद्वीधर/कृषी पदविका/तत्सम शैक्षणिक पात्रता शेती विषयक कामाचा अनुभव असणे गरजेचे
वयोमर्यादा, २५ ते ३५ वर्षे कार्यस्थळ,संगमनेर तालुका
ईच्छुक उमद्वारांनी बायोडाटा पुढील नंबरवर दि. १८/११/२०२६ व्हॉटसॲप किंवा इमेलवर पाठवावा. संपर्कः9850119046
Email:ens.krishivikasfpc@gmail.com
कृषी क्षेत्रात काम करण्याची आवड आणि शेतकऱ्यांसोबत काम करण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनी आजच अर्ज करावा!

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
ASMA MAHAMAD SAIYED
NEW NAME AS
ASMA BABLU WASIM SAYYED
ADDRESS
MITHA NAGAR, PUNE

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
Sonali Ramesh Kuldharan
NEW NAME AS
Sonali Santosh Mandlik
Rg.No.-M26296949
ADD- At/Post Raytewadi, Sangamner

**महाराष्ट्र शासन,जलसंपदा विभाग.**
**कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, नाशिक**

पत्ताः-बंगला क्र.अ.-११.मेरी परिसर,
दिंडोरी रोड, नाशिक-४२२००४,
ई-मेलः-eeghelidnk@gmail.com दूरध्वनी क्र.०२५३-२९७०२५९.

निविदा सूचना क्र.ब-१/१२ सन २०२६-२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,नाशिक, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरीता निविदा मागविता आहेत.सविस्तर निविदा सूचना शासनाच्या https://maharashtra.gov.in या संकेतस्थळवर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.
निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता.गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,नाशिक यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यलयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

कामाचे नावः-कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,नाशिक या कार्यलयाकरीता बाह्य यंत्रणेमार्फत निरिक्षण वाहन, चालक व इंधनासह भाडेतत्वावर घेणेबाबत.(अहिल्यानगर प्रकल्पासाठी)

जिल्हाः-अहिल्यानगर.
रुपयेः६,६५,०००/-(वस्तू व सेवाकार वगळून).
निविदा उपलब्ध कालावधीः-दिनांक १२/१०/२०२६ ते २२/१०/२०२६.
निविदा उघडण्याचा दिनांकः-२६/१०/२०२६

जा.क्र.काअ/गोजविवउसिंविना/लेखा/१११३/२०२६
कार्यकारी अभियंता, गोदावरी जलविद्युत व
दि.०१/१०/२०२६
कार्यकारी अभियंता,
गोदावरी जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,
नाशिक
जिमाका/नगर/जाहि/१४९/२०२६

CorelDRAW Ps Ai Id
WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट- १
(स्त्री / पुरूष)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

**पाहिजेत**
ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

**पाहिजेत**
ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
( सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य )
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ अॅण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

**पाहिजेत**
डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005

**Urgently Required**
Office Manager
Sangamner (1 Post)
Valuation Report Typist,
Property Visit.
Office Management.
Contact-
9421911671

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा भरणे आहे**
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431






# गावाच्या विकासासाठी मागेल तेवढा निधी देणार - आ. अमोल खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील ज्या मंदिरांना सभामंडप नाही, अशा मंदिरांना सभामंडप उपलब्ध करून देण्याचे काम तुमच्या आशीर्वादाने करत आहे. ग्रामस्थांच्या मागणीनुसार पुढील वर्षापर्यंत खराडी येथील मंदिरासमोर सभामंडप उभारण्यात येईल. असा शब्द आमदार अमोल खताळ यांनी दिला.

तालुक्यातील खराडी येथे नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित श्री भवानी (जगदंबा) मातेच्या भव्य ज्योत सोहळ्यात आमदार अमोल खताळ व त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी उपस्थित राहून मातेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या हस्ते विधिवत महाआरती करण्यात आली. या सोहळ्यास मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार खताळ म्हणाले, गावातील विकासकामांबाबत तुम्ही काळजी करू नका. विकासकामांसाठी मी कुठेही कमी पडणार नाही. धार्मिक कार्यासाठीही माझे सहकार्य कायम राहील. रस्त्यांच्या कामांसाठी निधीची गरज असेल आणि काही अडचण नसेल, तर त्यासाठीही निधी उपलब्ध करून देईन. गेल्या दीड वर्षात प्रत्येक गावाला मोठ्या प्रमाणात निधी दिला आहे. गावाच्या विकासासाठी आवश्यक तेवढ्या निधीची मागणी करा, मी निधी कमी पडू देणार नाही.

दरम्यान, गुजरातमधील शक्तिपीठावरून खराडी येथे आणण्यात आलेल्या पवित्र ज्योतीचे आमदार खताळ यांनी दर्शन घेतले. त्यानंतर ते भाविक आणि ग्रामस्थांसोबत ज्योत मिरवणुकीत सहभागी झाले. यावेळी त्यांनी उपस्थितांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

ज्योत सोहळा आणि महाआरतीमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक धार्मिक विधी, मातेच्या जयघोषाने दुमदुमलेला परिसर आणि भाविकांचा उत्साह यामुळे सोहळ्याला विशेष रंगत आली. आमदार खताळ यांच्या उपस्थितीमुळे तरुणांमध्येही उत्साह दिसून आला. गावातील तरुणांनी त्यांना खांद्यावर उचलून घेत जल्लोष केला. धार्मिक श्रद्धा, भक्तिभाव आणि ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागात खराडी येथील भवानी मातेचा ज्योत सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी महायुतीचे गोकुळ दिघे,पंकज मोरे, बाळासाहेब शिंदे, संजय साबळे,विलास मोरे, संकेत खुळे सचिन पावबाके रमेश साबळे जयराम खर्डे सर,सुभाष साबळे,सचिन धुमाळ, रवी मोरे, परशुराम काळे ,युवराज वाघशुभम राहणे,शैलेंद्र वाघ,सतीश पर्वत तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विरोधकांचा न्यायव्यवस्थेवर विश्वासच नाही - मुख्यमंत्री

मुंबई (वृत्तसंस्था)

सर्वोच्च न्यायालयावर थेट मोर्चा काढून देशाच्या सरन्यायाधीशांनी मोर्चाला सामोरे जावे किंवा त्यांना भेटावे, अशी मागणी करणे अत्यंत हास्यास्पद आणि धक्कादायक आहे. सतत संविधानाच्या गप्पा मारणाऱ्या विरोधकांनी आधी सांगावे की हे देशाच्या कोणत्या संविधानात लिहिले आहे? जर तुम्हाला काही तक्रार असेल तर कायदेशीर मार्गाने न्यायालयात या आणि लढा. स्वतःचे संविधानिक कर्तव्य बजावत सरन्यायाधीशांनी मोर्चाला भेटण्यास नकार दिला, तर त्यांच्याविरोधात खालच्या पातळीवर भाषा वापरली जात आहे. देशातील स्वायत्त आणि न्यायिक संस्थांना बदनाम करण्याचे आणि जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडवण्याचे हे विरोधकांचे पूर्वनियोजित षड्यंत्र आहे, असा पलटवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

नवी दिल्लीत निवडणूक आयोगाच्या विरोधात आणि मतदार पुनरीक्षणाच्या मुद्यावरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली 'इंडिया' आघाडीने काढलेला सर्वोच्च न्यायालयावरील मोर्चा आणि सरन्यायाधीशांच्या भेटीवरून सुरू असलेल्या राजकीय वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत माध्यमांशी बोलताना विरोधकांचा समाचार घेतला.

विरोधी पक्षांच्या कार्यपद्धतीवर आणि भूमिकेवर आश्चर्य व्यक्त करताना मुख्यमंत्री म्हणाले, विरोधी पक्षनेते अशी मागणी कशी काय करू शकतात, याचे मला आश्चर्य वाटते. आम्ही सुप्रीम कोर्टावर मोर्चा काढणार आणि सरन्यायाधीशांनी आम्हाला भेटलेच पाहिजे, असा हट्ट धरणे कोणत्या लोकशाही संकेतात बसते? सरन्यायाधीश कधी अशा कोणत्याही राजकीय मोर्चाला सामोरे जातात का?



सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली भूमिका १०० टक्के कायदेशीर आणि योग्य आहे. जर विरोधकांना कोणतीही तक्रार असेल, तर संविधानाने न्यायालयीन प्रक्रियेचा मार्ग आखून दिला आहे. तिथे याचिका दाखल करा आणि कोर्टात आपली बाजू मांडा. अशा प्रकारे रस्त्यावरून न्यायालयात घुसण्याचा प्रयत्न करणे म्हणजे दबाव आणण्याचा प्रकार आहे.

विरोधकांच्या एकंदर रणनीतीवर ताशेरे ओढताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले. जेव्हा देशातील जनता विरोधकांना नाकारते, तेव्हा ते निवडणूक आयोग, संसद आणि आता थेट सर्वोच्च न्यायालयासारख्या सर्वोच्च न्यायिक संस्थांवर चिखलफेक करायला सुरुवात करतात.सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेनंतर विरोधी नेत्यांकडून होणाऱ्या टीकेवर मुख्यमंत्री फडणवीस अत्यंत आक्रमक झाले. सरन्यायाधीशांनी आपले संविधानिक कर्तव्य बजावताना अगदी स्पष्ट शब्दांत सांगितले की, इमी कोणत्याही राजकीय मोर्चाला भेटू शकत नाही.' त्यांचा हा निर्णय कायद्याला धरून होता. मात्र, नकार मिळताच त्यांच्याविरोधात अत्यंत अश्लाघ्य, हीन आणि खालच्या पातळीवर टीकाटिप्पणी सुरू झाली. मी वारंवार जे सांगत आलो आहे, तेच आज पुन्हा सिद्ध झाले. या लोकांचा देशाच्या संविधानावर, कायद्याच्या राज्यावर आणि लोकशाहीवर काडीमात्र विश्वास नाही. हे पूर्णपणे संविधानविरोधी लोक आहेत.


चैतन्य हॉस्पिटल

डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

02425 – 224761, मोबा. 7038170382





सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी



आर्थिक अडचण आहे का?

काळजी करु नका !

सोनेतारण कर्ज

कमीत कमी व्याजदर

जास्तीत जास्त कर्ज

SMBT BANK

बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे

सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा

- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता



दर्शन टेक्सटाईल मार्केट

सेल... सेल... सेल

सेल नव्हे होलसेल सेल

मान्सून ऑफर

शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी

आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..



संपर्क :- 8390005001

पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605


## दिनविशेष

१९४३: दुसरे महायुद्ध — इटलीने अधिकृतपणे जर्मनीविरुद्ध युद्ध घोषित केले आहे.
१९२९: पर्वती देवस्थान, पुणे — दलितांसाठी खुले करण्यात आले.
१९२३: तुर्की — देशाची अंकारा शहर राजधानी बनली.
१८९२: एडवर्ड इमर्सन बर्नार्ड — यांनी फोटोग्राफिक पद्धतीने पहिला धूमकेतू शोधला.
१८८५: जॉर्जिया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी — स्थापना झाली.
१८८४: — ग्रिनिच जवळून जाणारे रेखावृत्त शून्य मानून आंतरराष्ट्रीय मान्यता त्यानुसार सर्व जगाची वेळ निश्चित केली गेली.
१८४३: बेनाई बिरथ इंटरनॅशनल — जगातील सर्वात जुनी ज्यू सेवा संस्था स्थापन झाली.
१८२१: मेक्सिकन साम्राज्य — स्वातंत्र्याची घोषणा सार्वजनिकरित्या करण्यात आली.
१७९२: व्हाईट हाऊस — या अमेरिकन प्रेसिडेंट यांच्या अधिकृत निवासस्थानाची कोनशिला घातली गेली.
१७७३: व्हर्लपूल गॅलेक्सी — चार्ल्स मेसियर यांनी या गॅलेक्सीचा शोध लावला.
००५४: रोमन साम्राज्य — नीरो १७व्या वर्षी रोमन सम्राट बनला.

## जन्म

१९४८: नुसरत फतेह अली खान — पाकिस्तानी सूफी गायक (निधन: १६ ऑगस्ट १९९७ )
१९४३: पीटर सऊबर — स्विस उद्योजक, सऊबर एफ १चे संस्थापक
१९४१: जॉन स्नो — इंग्लिश क्रिकेटपटू
१९३६: चित्ती बाबू — भारतीय वीणा वादक आणि संगीतकार — संगीत नाटक अकादमी पुरस्कार (निधन: ९ फेब्रुवारी १९९६ )
१९३०: सय्यद मुस्तफा सिराज — भारतीय लेखक (निधन: ४ सप्टेंबर २०१२ )
१९२५: मार्गारेट थॅचर — ब्रिटनच्या पहिल्या महिला पंतप्रधान (निधन: ८ एप्रिल २०१३ )
१९२४: मोतीरू उदयम — भारतीय राजकारणी (निधन: ३१ मार्च २००२ )
१९११: अशोक कुमार — भारतीय सुप्रसिद्ध अभिनेते — पद्म भूषण, पद्मश्री, राष्ट्रीय चित्रपट, दादासाहेब फाळके पुरस्कार (निधन: १० डिसेंबर २००१ )
१८७७: भुलाभाई देसाई — भारतीय राजनीतीज्ञ (निधन: ६ मे १९४६ )

## मृत्यू

२०१८: अन्नपूर्णा देवी — भारतीय सुरबहार (बास सितार) वादक — पद्म भूषण (जन्म: १९२७ )
२००३: बर्ट्राम ब्रॉकहाउस — कॅनेडियन भौतिकशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार (जन्म: १५ जुलै १९१८ )
२००१: जाल मिनोचर मेहता — भारतीय कुष्ठरोगतज्ज्ञ, शल्यचिकित्सक — पद्म भूषण
१९९५: अंचल — भारतीय हिंदी साहित्यिक (जन्म: १ मे १९१५ )
१९९३: टेकीं रिबूरून — तुर्की देशाचे माजी अध्यक्ष (जन्म: ३ ऑक्टोबर १९०३ )
१९८७: किशोर कुमार — भारतीय पार्श्वगायक, अभिनेता आणि संगीतकार, हिंदी चित्रपटसृष्टीतील बहुआयामी आणि लोकप्रिय कलाकार — आठ फिल्मफेअर सर्वोत्तम पार्श्वगायक पुरस्कार, विविध मरणोत्तर सन्मान (जन्म: ४ ऑगस्ट १९२९ )
१९४५: मिल्टन हर्शे — अमेरिकन उद्योजक, द हर्शे चॉकलेट कंपनीचे संस्थापक (जन्म: १३ सप्टेंबर १८५७ )
१९३८: ई. सी. सेगर — अमेरिकन व्यंगचित्रकार, पॉपय कार्टूनचे निर्माते (जन्म: ८ डिसेंबर १८९४ )
१९११: भगिनी निवेदिता — भारतीय तत्वज्ञानी, स्वामी विवेकानंदांच्या शिष्या (जन्म: २८ ऑक्टोबर १८६७ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**13 ऑक्टोबर**

## १८८४ : ग्रिनिच रेखावृत्ताला जागतिक मान्यता वेळेच्या प्रमाणबद्धतेची ऐतिहासिक सुरुवात

आज जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये वेळ निश्चित करण्यासाठी ज्या आंतरराष्ट्रीय पद्धतीचा आधार घेतला जातो, तिच्या विकासातील १८८४ हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. या वर्षी अमेरिकेतील वॉशिंग्टन येथे आंतरराष्ट्रीय मेरिडियन परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत इंग्लंडमधील लंडनजवळील ग्रिनिच येथून जाणारे रेखावृत्त हे जगाचे प्रमुख शून्य रेखावृत्त (Prime Meridian) म्हणून स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला.पृथ्वी गोलाकार असल्यामुळे तिच्या विविध भागांमध्ये स्थानिक वेळेत फरक पडतो. पूर्वी प्रत्येक शहर किंवा प्रदेश सूर्याच्या स्थितीनुसार आपली स्थानिक वेळ ठरवत असे. त्यामुळे एका शहरातून दुसऱ्या शहरात प्रवास करताना, विशेषतः रेल्वेसेवा आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात, वेळेच्या गणनेत अनेक अडचणी निर्माण होत होत्या. रेल्वेचा विस्तार आणि देशांमधील वाढते दळणवळण यामुळे वेळेचे एकसमान मोजमाप असण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली होती.ही गरज लक्षात घेऊन १८८४ मध्ये वॉशिंग्टन येथे आंतरराष्ट्रीय परिषद भरवण्यात आली. या परिषदेत २५ देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. चर्चेनंतर ग्रिनिच येथून जाणाऱ्या रेखावृत्ताला शून्य अंश रेखावृत्त मानण्याचा प्रस्ताव स्वीकारण्यात आला. या रेखावृत्ताच्या आधारे पृथ्वीवरील पूर्व आणि पश्चिम दिशेतील रेखावृत्तांची मोजणी करण्याची पद्धत निश्चित झाली. या निर्णयामुळे जगभरातील वेळेची गणना अधिक सुसंगत करण्याचा मार्ग मोकळा झाला.ग्रिनिच हे इंग्लंडमधील रॉयल ऑब्झर्व्हेटरीसाठी प्रसिद्ध आहे. तेथील खगोलशास्त्रीय निरीक्षणांच्या आधारे वेळ आणि रेखावृत्तांची गणना केली जात असे. ग्रिनिचच्या वेळेला पुढे ग्रीनविच मीन टाइम (GMT) म्हणून ओळख मिळाली. आंतरराष्ट्रीय वेळेच्या समन्वयासाठी या वेळेचा मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला.शून्य रेखावृत्ताच्या पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे रेखावृत्तांची मोजणी करून पृथ्वीवरील ठिकाणांचे भौगोलिक स्थान निश्चित करणे सोपे झाले. पृथ्वीला २४ तासांत ३६० अंश फिरण्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता, साधारण प्रत्येक १५ अंश रेखावृत्तांमागे एक तासाचा वेळेतील फरक पडतो. याच तत्त्वाचा उपयोग विविध देशांच्या प्रमाणवेळा निश्चित करण्यासाठी केला जातो.मात्र, १८८४ मध्ये झालेल्या निर्णयामुळे संपूर्ण जगाची वेळ एकाच क्षणी कायमस्वरूपी निश्चित झाली, असे म्हणणे अचूक ठरणार नाही. त्या परिषदेत शून्य रेखावृत्त निश्चित करण्यास मान्यता मिळाली; पुढे विविध देशांनी आपापल्या प्रमाणवेळा स्वीकारल्या. आज वेळेच्या जागतिक समन्वयासाठी समन्वित जागतिक वेळ (UTC) वापरली जाते.भारताची प्रमाणवेळ भारतीय प्रमाणवेळ (IST) म्हणून ओळखली जाते. ती ८२ अंश ३० मिनिटे पूर्व रेखावृत्तावर आधारित असून, UTC पेक्षा ५ तास ३० मिनिटे पुढे आहे.अशा प्रकारे, १८८४ मधील ग्रिनिच रेखावृत्तासंबंधीचा निर्णय हा आधुनिक जगातील वेळेच्या प्रमाणबद्धतेच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

## डॉ. जल मिनोचर मेहता : भारतीय कुष्ठरोगतज्ज्ञ आणि शल्यचिकित्सक

**जन्मदिन विशेष**

डॉ. जल मिनोचर मेहता हे भारतातील प्रसिद्ध कुष्ठरोगतज्ज्ञ आणि शल्यचिकित्सक होते. त्यांनी कुष्ठरोगाने ग्रस्त रुग्णांवर उपचार करणे, शस्त्रक्रिया करणे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. वैद्यकीय क्षेत्रातील ज्ञान आणि समाजसेवेची भावना यांच्या बळावर त्यांनी अनेक रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी काम केले.कुष्ठरोग हा एक संसर्गजन्य आजार असून, त्याविषयी समाजात पूर्वी अनेक गैरसमज होते. या आजाराने ग्रस्त व्यक्तींना सामाजिक भेदभावाचा सामना करावा लागत असे. अनेकदा रुग्णांना कुटुंबापासून आणि समाजापासून दूर ठेवले जात होते. अशा परिस्थितीत कुष्ठरुग्णांना योग्य उपचार, आधार आणि सन्मान मिळावा, यासाठी डॉ. मेहता यांनी कार्य केले. त्यांनी रुग्णांकडे केवळ आजाराने ग्रस्त व्यक्ती म्हणून न पाहता, त्यांना समाजातील इतर नागरिकांप्रमाणे समान अधिकार आणि सन्मान मिळायला हवा, या विचाराला महत्त्व दिले.डॉ. मेहता यांनी कुष्ठरोगाच्या उपचारांबरोबरच रुग्णांच्या शारीरिक क्षमतेत सुधारणा करण्यासाठी शस्त्रक्रिया आणि पुनर्वसनाच्या क्षेत्रात काम केले. कुष्ठरोगामुळे काही रुग्णांच्या हात-पायांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. अशा रुग्णांना दैनंदिन जीवनातील कामे करता यावीत आणि ते पुन्हा स्वावलंबी बनावेत, यासाठी वैद्यकीय उपचारांसोबत पुनर्वसन आवश्यक असते. या बाबींचे महत्त्व त्यांनी आपल्या कार्यातून अधोरेखित केले.पुणे परिसरातील कुष्ठरोग नियंत्रण आणि पुनर्वसनाच्या उपक्रमांमध्ये त्यांचे योगदान महत्त्वाचे होते. रुग्णांना उपचार मिळण्याबरोबरच त्यांना समाजात पुन्हा सामावून घेणे, त्यांच्याविषयी जनजागृती



करणे आणि त्यांना आत्मविश्वासाने जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन देणे, या बाबींवर त्यांनी भर दिला. कुष्ठरोग हा उपचारांनी बरा होऊ शकणारा आजार आहे, याबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणेही महत्त्वाचे होते.त्यांच्या वैद्यकीय आणि सामाजिक कार्याची दखल भारत सरकारने घेतली. १९८२ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा भारतातील महत्त्वाचा नागरी सन्मान असून, त्यांच्या कार्याचा राष्ट्रीय स्तरावर झालेला गौरव दर्शवतो.डॉ. जल मिनोचर मेहता यांचे १३ ऑक्टोबर २००१ रोजी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने कुष्ठरोग उपचार आणि पुनर्वसन क्षेत्रातील समर्पित वैद्यकीय तज्ज्ञ हरपला.डॉ. मेहता यांचे जीवन वैद्यकीय व्यवसायातील सेवाभावाचे महत्त्व स्पष्ट करते. रुग्णांवर उपचार करणे एवढेच डॉक्टरांचे कार्य नसून, त्यांना सन्मानाने आणि स्वावलंबीपणे जगण्यासाठी मदत करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कुष्ठरुग्णांसाठी त्यांनी केलेले कार्य हे वैद्यकीय सेवा, मानवता आणि सामाजिक बांधिलकी यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
काजळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांकडून सक्तीची वीजबिल वसुली थांबवा

## वीजजोडणी खंडित केल्यास शिवसेना (ठाकरे) छेडणार आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात दुष्काळाची तीव्र परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत महावितरणकडून थकीत वीजबिलांच्या वसुलीसाठी सक्ती केली जात असल्याचा आरोप करत, दुष्काळग्रस्त शेतकरी व नागरिकांची वीजबिल वसुली थांबवावी आणि कोणाचीही वीजजोडणी खंडित करू नये, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत महावितरणच्या संगमनेर विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले आहे. संगमनेर तालुक्यात दुष्काळामुळे शेतीचे उत्पादन घटले असून पाण्याची समस्याही गंभीर बनली आहे. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच सर्वसामान्य नागरिकांनाही आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत थकीत वीजबिलांच्या कारणास्तव वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई केली जात असल्याचे निवेदनात म्हटले.

दुष्काळाच्या काळात शेतकरी आणि नागरिकांना दिलासा देण्याऐवजी वीजबिल वसुलीसाठी तगादा लावणे अन्यायकारक असल्याची भूमिका शिवसेनेने मांडली आहे. महावितरण प्रशासनाने संवेदनशील भूमिका घेऊन सक्तीची वीजबिल वसुली थांबवावी. तसेच, दुष्काळग्रस्त शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांची वीजजोडणी खंडित करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारा पक्ष असल्याचे नमूद करत, दुष्काळग्रस्त जनतेवर वीजबिल वसुलीच्या नावाखाली अन्याय झाल्यास तो सहन केला जाणार नाही, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनाची तातडीने दखल घेऊन वीजबिलांची सक्तीची वसुली आणि वीजजोडणी खंडित करण्याची कारवाई थांबवावी; अन्यथा महावितरण कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनाची जबाबदारी महावितरण प्रशासनावर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनावर तालुका प्रमुख अमर करारी, युवा सेना जिल्हाप्रमुख अमित चव्हाण, राजू सातपुते, कैलास गायके, असिफ ताबोनी आणि इम्तियाज शेख यांच्यासह अनेक शिवसैनिकांच्या सह्या आहेत.

# 'एसआयआर'विरोधात संगमनेरात निदर्शने

## केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी! ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मतदार यादीच्या विशेष गहन पुनर्निरीक्षणाची (एसआयआर) प्रक्रिया तातडीने रद्द करावी, केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, यासह विविध मागण्यांसाठी रविवारी (दि. ११) संगमनेरमध्ये विविध पुरोगामी संघटना आणि जागरूक नागरिकांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली. शहरातील बसस्थानक परिसरात झालेल्या या आंदोलनात केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. विविध मागण्यांचे फलक झळकावत आंदोलकांनी सरकारच्या धोरणांविरोधात संताप व्यक्त केला. मतदार यादीच्या विशेष गहन पुनर्निरीक्षण प्रक्रियेवर आक्षेप नोंदवत या प्रक्रियेला विरोध करणाऱ्या आंदोलकांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणाचा मुद्दा उपस्थित केला. केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत एसआयआर प्रक्रिया तातडीने रद्द करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

लोकशाही व्यवस्थेत आंदोलन करणे हा नागरिकांचा अधिकार असून, आंदोलनकर्त्यांशी बळाचा वापर करून वागण्याऐवजी त्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. आंदोलनस्थळी केंद्र सरकारच्या विरोधातील घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. 'जो हिटलर की चाल चलेगा, वो हिटलर की मौत मरेगा', असा मजकूर असलेले फलक झळकावून आंदोलकांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका केली.

या आंदोलनात ज्येष्ठ साहित्यिक प्रा. हिरालाल पगडाल, राष्ट्र सेवा दलाचे माजी प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ अवसक, ज्येष्ठ विधिज्ञ निशा शिवूरकर, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बुवाबाजी संघर्ष विभागाच्या राज्य सचिव ॲड. रंजना पगार गवांदे, सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास पगडाल, सीताराम राऊत, छात्रभारती विद्यार्थी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिकेत घुले, राम चन्ना, ॲड. नईम इनामदार, विनोद गायकवाड, रजत अवसक, प्रशांत पानसरे, मोहम्मद कैफ तांबोळी यांच्यासह विविध संघटनांचे कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते.

मतदार यादीच्या पुनर्निरीक्षण प्रक्रियेवरील आक्षेप, केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी आणि दिल्लीतील आंदोलनावरील पोलिसी कारवाईचा निषेध या मुद्द्यांवरून संगमनेरमध्ये विविध पुरोगामी संघटना आणि नागरिकांनी एकत्र येत आपली भूमिका मांडली.

# आरोपींना अटक कधी? पत्नीचा संतप्त सवाल

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले : तालुक्यातील पिंपळगाव नाकविंदा येथे घरात घुसून एका कुटुंबाला लोखंडी रॉड व काठ्यांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात देविदास जाधव गंभीर जखमी झाले असून, घोटी येथील एसएमबीटी रुग्णालयात त्यांच्यावर व्हेंटिलेटरवर उपचार सुरू आहेत. मात्र, घटनेला पंधरा दिवस उलटूनही संशयित आरोपींना अटक न झाल्याने पीडित पत्नी निर्मला जाधव यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त केला आहे.

२६ सप्टेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास सात संशयितांनी जाधव यांच्या घरात घुसून निर्मला जाधव व त्यांच्या ७६ वर्षीय सासू मंदाबाई यांना मारहाण केली. त्यानंतर मोटारसायकलवरून येणाऱ्या देविदास जाधव यांना रस्त्यात अडवून त्यांच्या डोक्यावर व अंगावर लोखंडी रॉडने हल्ला केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात त्यांच्या मेंदूला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला, तर निर्मला जाधव यांच्या पायाला फ्रॅक्चर झाले असून डोक्यालाही दुखापत झाली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी सुरुवातीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ नुसार गुन्हा दाखल केल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. संशयित आरोपी मोकाट फिरत असल्याचा आरोप करत निर्मला जाधव यांनी सर्वांना तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे.

तु पोलिसांचे काम करते का?' असा सवाल करत पोलिस कर्मचाऱ्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याचा आरोपही त्यांनी केला. गंभीर जखमी पती रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत असताना आरोपींना अटक कधी होणार, असा संतप्त सवाल पीडित कुटुंबाने उपस्थित केला आहे.

स्व. भाऊसाहेब विठ्ठलराव विखे पाटील
यांना भावपूर्ण श्रद्धांजली



* दशक्रिया विधी *
मंगळवार दि. १३/१०/२०२६ रोजी सकाळी ८:०० वा.
याप्रसंगी गुरुवर्य महंत उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) यांचे प्रवचन होईल.
* दु:खांकित *
श्रीमती मंदाकिनी भाऊसाहेब विखे पाटील (पत्नी)
डॉ.श्री.अशोक एकनाथराव विखे पाटील (पुतणे)
डॉ.श्री.नामदार राधाकृष्ण विखे पाटील (पुतणे)
डॉ.श्री.राजेंद्र एकनाथराव विखे पाटील (पुतणे)
मा.खा.डॉ.सुजय राधाकृष्ण विखे पाटील (नातु)
श्री.किम अशोकराव विखे पाटील (नातु)
चि.ध्रुव राजेंद्र विखे पाटील (नातु)
श्री.एकानाथराव चंद्रभान घोगरे पाटील (जावई)
सौ.अरुणाताई एकनाथराव घोगरे पाटील (मुलगी)
श्री.सुरेशराव गेणूजी कोल्हे पाटील (जावई)
सौ.अनिता सुरेशराव कोल्हे पाटील (मुलगी)
सौ.कांचन सचिन रोहमारे पाटील (नात)
सुप्रिया सुरेशराव कोल्हे पाटील (नात)
श्री.आदित्य सुरेशराव कोल्हे पाटील (नातु)
श्री.विक्रांत भाऊसाहेब विखे पाटील (मुलगा)
श्री.विजय भाऊसाहेब विखे पाटील (मुलगा)
डॉ.श्री.विक्रम भाऊसाहेब विखे पाटील (मुलगा)
श्री.विराज विक्रांत विखे पाटील (नातु)
श्री.राहुल विक्रांत विखे पाटील (नातु)
कु.शिवानी विजय विखे पाटील (नात)
कु.तनिष्का विक्रम विखे पाटील (नात)
कष्टाने केली आयुष्याची सुरूवात । सर्वांना दिली सुख- दु:खात साथ ।।
नकार आणि तक्रार हे शब्दच नव्हते ज्ञात। दृष्ट लागली सुखाला ।
उरली नाही साथ आम्हाला ।। सुख जवळ येत काळाने फिरविला हात,
जन्मोजन्मी पाहु आम्ही अण्णा तुमचीच वाट
समस्त विखे पाटील परिवार व आप्तेष्ट
ठिकाण- लोणी (मुक्तीधाम- नाशिक पुल), ता. राहाता, जि. अहिल्यानगर

कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist



डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25